MHBU140024182023

दाखल दिनांकः २८/११/२०२३
नोंदणी दिनांकः २८/११/२०२३
निकाल दिनांकः ०२/०६/२०२६
कालावधीः ०२ वर्षे ०६ महिने ०५ दिवस

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मेहकर यांचे न्यायालय

(पिठासीन अधिकारी श्रीमती सपना एम.पाटील यांचेसमक्ष)

म.कौ.हिं.सं. अर्ज क्र.६६/२०२३ नि.क्र. ०८
CNR No.MHBU-140024182023

१. **सौ. पुजा विजय सदावर्ते**,
वय अं.२८ वर्षे, धंदाः घरकाम,

२. **वैष्णवी विजय सदावर्ते**,
वय अं.०६ वर्षे, धंदाः शिक्षण,

३. **संविधान विजय सदावर्ते**,
वय अं.०५ वर्षे, धंदाः अज्ञान
सर्व अर्जदार रा. **शेलगांव देशमुख,**
ता. **मेहकर**, जि. **बुलडाणा** ...... **अर्जदार**

**विरुध्द**

१. **विजय शामराव सदवर्ते**,
वय अं. ४० वर्षे, धंदाः रंगकाम ठेकेदार,

२. **मिना शामराव सदावर्ते,**
वय अं.७० वर्षे, धंदाः सेवानिवृत्त,
रा. **राहुल नगर, रेल्वे स्टेशन जवळ,**
**छ. संभाजीनगर,**ता.जि. **छ. संभाजीनगर.** ...... **गैरअर्जदार**

---

अर्जदारांतर्फे – **विधिज्ञ श्री ए.पी. पवार**
गैरअर्जदारांतर्फे – **एकतर्फा**

---

**न्यायनिर्णय**
(अधिघोषित दि. ०२/०६/२०२६)

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ यातील कलम १२, १८, १९, २० व २२ अन्वये दाखल केला आहे.

**०२**. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदाराचे लग्न गैरअर्जदार क्र. १ यांचे सोबत दिनांक २६/०४/२०१६ रोजी झाले होते. सदर लग्नसंबंधातुन अर्जदार हिला दोन अपत्ये आहे. लग्नानंतर गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी अर्जदार हिला ५ ते ६ महिणे चांगले नांदविले. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ अर्जदार यांना रोजच दारु पिऊन येऊन शिवीगाळ करुण मारझोड करु लागला. गैरअर्जदार क्र. १ दारु पिण्यासाठी घरातील भांडे विकु लागला व त्यासाठी अर्जदार हिने विरोध केला असता, तिला मारझोड करत असे. गैरअर्जदार क्र. १ अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेत असे व संशयाच्या कारणावरुण, तिला घराच्या बाहेर जाऊ देत नसे तसेच अर्जदार हिला कोणासोबत बोलु देत नसे. गैरअर्जदार क्र. १ घरामध्ये कुठल्याही खान्यापिण्याच्या व दैनंदिन वस्तु आणत नसे. तसेच अर्जदाराची व मुलांची कुठल्याही प्रकारची काळजी घेत नसे.

**०३**. अर्जदाराचे पुढे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार क्र. १ अर्जदार व तिच्या मुलांची कुठल्याही प्रकारची काळजी करत नाही व बिमार पडले तर त्यांचा दवाखाना देखील करत नसे. गैरअर्जदार क्र. १ त्यांच्या आईचे ऐकुण अर्जदारासोबत विनाकारण भांडण करुन जिव घेणी मारझोड करत असे. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराला नेहमीच जिवे मारण्याच्या धमक्या देता व तिला दारु पिण्यासाठी पैशाची मागणी करतो. गैरअर्जदार क्र. १ अर्जदाराचे सोन्याचे दागिणे मोडुन टाकले आहे. गैरअर्जदार क्र. १ अर्जदार हिला तिच्या माहेरवरुण पैसे आणण्यासाठी त्रास देत असे, पैशासाठी अर्जदाराला शारिरीक मानसिक त्रास देत असे. अर्जदाराने तिच्या पतीला

सांगितले की, त्यांच्या आईवडिलांची परिस्थिती गरीबीची आहे ते पैसे देऊ शकत नाहीत. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ अर्जदाराला व तिच्या मुलांनाही मारझोड करुन तिला तिच्या मुलांना जिवे मारण्याच्या धमक्या देऊ लागला. गैरअर्जदार क्र. १ दारु पिऊन आल्यानंतर अर्जदारासोबत भांउण करुन तिला व तिच्या मुलांना बरेच वेळा रात्री बेरात्री घराच्या बाहेर काढुन देत होता. दिनांक २५/०१/२०२३ रोजी गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदारासोबत भांडण करुन तिचे डोके भिंतीवर आपटले होते तेव्हा अर्जदार हिला खुप दुखापत झाली होती. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ याने दारु पिऊन पट्याने अर्जदार हिला खुप मारझोड केली व म्हणाला की, तुझ्या माहेरवरुन पैसे घेऊन ये. तेव्हा पासुन अर्जदार ही माहेरीच आहे. गैरअर्जदार क्र. १ व २ यांच्या अशा वागणुकी बाबत अर्जदार व तिचे नातेवाईक यांनी बरेच वेळा गैरअर्जदार यांना समजाऊन सांगण्याचा प्रयत्न केला परंतु, गैरअर्जदारांच्या वागणुकी मध्ये काहीही फरक पडला नाही.

०४. गैरअर्जदार क्र.१ हा सुखी व ऐशोआरामी जीवन जगत असुन पत्नी म्हणुन अर्जदाराला व मुलांना जगविणे ही त्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारांना प्रत्येकी रु.१०,०००/– प्रती महीना सहज देवु शकतो. तसेच अर्जदारांना अन्न कपडे, औषधोपचार आणि इतर प्राथमिक जरुरीच्या वस्तु रक्कम रुपये ३०,०००/– महीना मिळणे आवश्यक आहे. घरभाडे रक्कम रुपये ५,५००/–. अर्जदाराचे गैरअर्जदाराने दिलेल्या मानसिक व शारीरिक छळामुळे बिघडलेले आरोग्य व इतर सहजीवनाच्या नुकसानीबाबत नुकसान भरपाई म्हणुन रु.५,००,०००/– गैरअर्जदारांकडुन एकमुस्त वसुल करुन मिळणे न्यायोचित आहे. त्यामुळे अर्जदार हीला महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण अधिनियमाचे तरतुदी अंतर्गत भावनिक, शारीरिक व मानसिक संरक्षणात्मक आदेश तसेच आर्थिक नुकसान भरपाई व उदरनिर्वाहाकरिता खर्च आणि राहण्याची व्यवस्था इत्यादी स्वरुपाचा न्याय मिळण्याकरिता गैरअर्जदार यांचेविरुध्द महिलांचे कौटूंबिक हिंसाचार अधिनियम, २००५ अंतर्गत सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०५. सदरच्या अर्जावरुन गैरअर्जदारांना सुचनापत्रे तामील झाले व ते हजर झाले परंतु त्यांनी त्यांचा लेखी जवाब प्रकरणात दाखल केला नाही. म्हणुन निशाणी क्र.१ वरिल आदेशान्वये

प्रकरण त्यांचेविरुध्द एकतर्फा चालविण्यात आले.

०६. अर्जदारांचे अर्जातील कथने, उपलब्ध पुरावा व कायद्यातील तरतुदी विचारात घेता पुढील मुद्दे माझ्या विचाराधीन आलेले आहेत. अर्जदारातर्फे युक्तिवाद व उपलब्ध पुराव्यावरुन मी त्यावर माझे निष्कर्ष त्या खाली दिलेल्या कारणांसहित पुढीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अनु. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | गैरअर्जदारांनी त्यांच्यावर घरगुती हिंसाचार केला, हे अर्जदार यांनी सिध्द केले आहेत काय ? | **होकारार्थी.** |
| २ | अर्जदार हे संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहेत काय ? | **होकारार्थी.** |
| ३ | अर्जदार हे त्यांच्या उदरनिर्वाहासाठी भत्ता मिळण्यास पात्र आहेत काय ? | **अंशतः होकारार्थी.** |
| ४ | अर्जदार हे निवासी आदेश मिळण्यास पात्र आहेत काय ? | **नकारार्थी.** |
| ५ | अर्जदार हे शारीरिक व मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत काय ? | **अंशतः होकारार्थी.** |
| ६ | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

०७. अर्जातील कथने सिध्द करण्याचे उद्देशाने अर्जदार हिने तिचा स्वतःचा पुरावा निशाणी क्र. **०६** तसेच अर्जदाराने पुरसिस निशाणी क्र. **०७** देऊन आपला पुरावा बंद केला. गैरअर्जदारांना पुरेशी संधी देवुन आपली बाजु मांडली नाही तसेच आपल्या बाजुने कोणताही पुरावा दिला नाही.

०८. अर्जदारांतर्फे विधिज्ञ **श्री ए. पी. पवार** यांनी असा युक्तिवाद केला की,

गैरअर्जदाराने अर्जदाराचा शारीरिक व मानसिक छळ केला, तिच्या चारित्र्यावर संशय घेतला, गैरअर्जदार क्र.२ यांनी कानभरणी करुन तिला त्रास देण्यास प्रवृत्त केले. गैरअर्जदार यांनी अर्जदार हीचेवर कौटुंबिक हिंसाचार केला. करिता तिला कौटूंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत संरक्षण व लाभ देण्यात यावा.

## <u>मुद्दा क्र.१ करिताः(कौटूंबिक हिंसाचार)</u>

**०९.** अर्जदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, तिने तिचा पुरावा अर्ज नि.क्र. ०६ अन्वये दिला आहे. तिने तिच्या पुराव्यात अर्ज नि.क्र.१ प्रमाणे शपथेवर कथन केलेले आहे. मुद्दा क्र.१ सिध्द करण्याकरिता गैरअर्जदार याने तिचा कौटुंबिक हिंसाचार केला हे गरजेचे आहे. अर्जदाराने तिच्या शपथपत्राच्या पुराव्या आधारे गैरअर्जदारांनी तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केला. तसेच गैरअर्जदाराने तिला शिवीगाळ करुन मारहाण केली, या सर्व बाबी शपथेवर सांगितल्या आहेत. गैरअर्जदारांविरुध्द प्रकरण विना लेखी जबाब चालविण्यात आल्यामुळे अर्जदाराचा पुरावा हा विनाआव्हानीत राहीलेला आहे. अर्जदाराच्या पुराव्यावरुन गैरअर्जदाराने अर्जदारास शारीरिक व मानसिक त्रास देवुन कौटुंबिक हिंसाचार केला, ही बाब सिध्द होते, त्यामुळे **मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येते.**

## <u>मुद्दा क्र.२ करिताः(संरक्षण आदेश)</u>

**१०.** अर्जदार हीने गैरअर्जदारांनी तिचा कौटुंबिक हिंसाचार केला, ही बाब सिध्द केली आहे. तसेच गैरअर्जदार तिचा नेहमी छळ करित होता म्हणुन ती तिच्या आईवडीलांकडे राहायला गेली. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये कौटुंबिक हिंसाचार कायद्याचे कलम १८ अन्वये अर्जदारांना संरक्षण आदेश देणे न्यायोचित होईल. त्यामुळे अर्जदारास गैरअर्जदार यांच्याविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण देण्यात येते व **मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येते.**

## <u>मुद्दा क्र.३ करिताः(उदरनिर्वाह भत्ता)</u>

**११.** अर्जदार हीने गैरअर्जदाराविरुध्द दरमहा स्वतःकरिता व मुलांकरिता प्रत्येकी रुपये

१०,०००/– उदरनिर्वाह भत्त्याची मागणी केलेली आहे. अर्जदार हे गैरअर्जदार क्र.१ यांची लग्नाची कायदेशीर पत्नी व मुले आहेत. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ याने त्याचे पत्नी व मुलांचा सांभाळ करणे, हे त्यांचे नैतिक कर्तव्य आहे. गैरअर्जदार क्र.१ असतांना अर्जदार व तिचे मुलांना तिच्या आईवडीलांच्या दयेवर जगु देणे कायदेशीरित्या न्यायाचे दृष्टीने योग्य होणार नाही, त्यामुळे वर चर्चा केल्याप्रमाणे मी या निष्कर्षास आले आहे की, गैरअर्जदारांनी अर्जदारास उत्पन्नाचे स्त्रोत असतांनाही दुर्लक्षित केलेले आहे. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये अर्जदार हे उदरनिर्वाह भत्ता मिळण्यास पात्र आहे.

**१२**. अर्जदारांनी उदरनिर्वाह भत्ता हा सर्व गैरअर्जदारांकडुन दरमहा प्रत्येकी रु.१०,०००/– ची मागणी केलेली आहे. गैरअर्जदार क्र.२ हे सासु असल्याने त्यांनी अर्जदारास उदरनिर्वाह भत्ता देण्याचे आदेशीत करावे हे न्यायाचे दृष्टीने योग्य होणार नाही, कारण गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदाराचे पती व वडील असल्याने त्यांनी त्यांचे कर्तव्य सांभाळले पाहीजे.

**१३**. अर्जदार यांच्या पुराव्यावरुन असे दिसुन येते की, गैरअर्जदार क्र.१ हा स्वतः बिल्डींगला रंगविण्याचे ठेके घेतो व त्यापासुन वर्षाकाठी ७ ते ८ लाख रुपये उत्पन्न होते. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये गैरअर्जदाराने अर्जदारांचा सांभाळ करणे व त्यांचे उदरनिर्वाह भरण्याची तरतुद करणे हे त्याचे नैतिक कर्तव्य आहे. गैरअर्जदारांच्या कृत्यामुळे तिला माहेरी राहावे लागते व तिला व तिचे मुलांना उदरनिर्वाहाकरिता दरमहा प्रत्येकी रु.१०,०००/– ची गरज आहे.

**१४.** अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ हा स्वतः बिल्डींग रंगविण्याचे काम करीत असुन त्यापासुन ७ ते ८ लाख रुपये वार्षीक उत्पन्न कमवितो, ही बाब सिध्द करण्याकरिता कोणताही पुरावा दिलेला नाही. त्यामुळे जर एखादी व्यक्ती कामावर असेल तर त्याला किमान दररोज ३०० ते ४०० वेतन मिळत असल्याची शक्यता नाकारता येवु शकत नाही. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये गैरअर्जदाराने अर्जदारांचा सांभाळ करणे व त्यांचे उदरनिर्वाह भरण्याची तरतुद करणे हे त्याचे नैतिक कर्तव्य आहे. परंतु उपलब्ध पुराव्यानुसार गैरअर्जदाराने अर्जदारांचा सांभाळ करण्यास टाळाटाळ केल्याची बाब अभिलेखावर आलेली आहे. अर्जदार हे त्याची विवाहाची पत्नी व मुले

असल्याने त्यांची जबाबदारी त्याला झटकुन टाकता येणार नाही.

**१५.** आजकालचा महागाईचा काळ, दैनंदिन गरजा याचा विचार केला असता, मी या निष्कर्षास आली आहे की, अर्जदार क्र.१ हीस रु. २,०००/–, अर्जदार क्र. २ व अर्जदार क्र. ३ यांना प्रत्येकी रु.१,०००/– उदरनिर्वाह भत्ता म्हणुन अर्ज दाखल तारखेपासुन मिळविण्यास पात्र आहे. त्याकरिता **मुद्दा क्र.३ हा अंशतः होकारार्थी नोंदविण्यात येते.**

**<u>मुद्दा क्र.४ करिताः (निवासी आदेश)</u>**

**१६.** अर्जदाराने तिला रहिवासाची व्यवस्था किंवा पर्यायी घरासाठी गैरअर्जदाराने भाडे द्यावे अशी मागणी केली आहे. परंतु अर्जदाराने पुराव्यामध्ये त्याबाबत काहीच सांगितलेले नाही. अर्जदाराने तिच्या पुराव्यामध्ये घरभाडे अथवा रहिवासाची व्यवस्था याबाबत उल्लेख केलेला नाही. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये अर्जदार ही निवासी आदेश मिळण्यास माझे मते पात्र नाही. त्यामुळे सबब **मुद्दा क्र.४ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.**

**<u>मुद्दा क्र.५ करिताः(नुकसान भरपाई)</u>**

**१७.** अर्जदाराने तिला झालेल्या घरगुती हिंसाचारामुळे झालेल्या नुकसान भरपाईपोटी एकुण रु.५,००,०००/– इतक्या रकमेची मागणी केली आहे. परंतु अर्जदारांनी रु.५,००,०००/– एवढया रकमेची मागणी कोणते निकष लावुन केली, हे देखील स्पष्ट होत नाही. अर्जदाराची मागणी ही आवाढव्य स्वरुपाची वाटते. परंतु उपलब्ध पुराव्यावरुन अर्जदार हीस त्रास दिल्याचे स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत केवळ गैरअर्जदारामुळे अर्जदारांना तिच्या कौटुंबिक सुखासाठी वंचीत राहणे भाग पाडलेले आहे. त्यामुळे गैरअर्जदारांनी अर्जदार हीस घरगुती हिंसाचारापासुन झालेल्या त्रासापोटी रु.२०,०००/– एवढी रक्कम नुकसान भरपाई म्हणुन देणे न्यायोचित वाटते. सबब त्यानुसार **मुद्दा क्र.५ हा अंशतः होकारार्थी नोंदविण्यात येतो.**

**<u>मुद्दा क्र.६ करिताः(अंतिम आदेश)</u>**

१८. उपलब्ध पुरावा तसेच त्या अनुषंगाने मुद्दा क्र.१ ते ५ साठी माझे निष्कर्ष विचारात घेता अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. सबब खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार क्र. १ व २ यांना अर्जदार हिस घरगुती हिंसाचार करण्यापासुन प्रतिबंधीत करण्यात येते.

३. गैरअर्जदार क्र.१ **विजय शामराव सदावर्ते** ने अर्जदार क्र.१ **पुजा विजय सदावर्ते** यांना प्रतिमाह **रु.२,०००/-(रुपये दोन हजार फक्त)** आणि अर्जदार क्र. २ **वैष्णवी विजय सदावर्ते**, अर्जदार क्र.३ **संविधान विजय सदावर्ते**, यांना प्रत्येकी **प्रतिमाह रु.१,०००/- (रुपये एक हजार फक्त)** असे एकुण रुपये **४,०००/- (रुपये चार हजार फक्त)** प्रमाणे उदरनिर्वाह भत्ता अर्ज दाखल तारखेपासुन पुढे द्यावे, असे आदेशीत करण्यात येत आहे. (अंतरिम भत्ता जर गैरअर्जदाराने भरला असेल तर तो सदर रक्कमेतुन वजा करण्यात यावा.)

४. अर्जदाराची निवासी आदेशाची मागणी नामंजूर करण्यात येते.

५. गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी संयुक्तिकरित्या अर्जदारास शारीरिक व मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई म्हणुन रुपये **२०,०००/- (रुपये वीस हजार फक्त)** दयावेत.

६. हया न्यायनिर्णय व आदेशाची प्रत अर्जदार, गैरअर्जदार, संरक्षण अधिकारी व संबंधित पोलीस ठाण्यास आदेशाच्या अंमलबजावणीकरिता मोफत देण्यात यावी.
(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात संगणकावर टंकलिखित करुन अधिघोषित करण्यात आला.)

स्वा/-

दि.०२/०६/२०२६

**(सपना एम. पाटील)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, तथा
न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, मेहकर.

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/order are same word for word, as per original Judgment/order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : H. L. Korde |
| Name of the Court | : Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Mehkar. |
| Dated | : 02/06/2026 |
| Order uploaded on | : 02/06/2026 |